सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.अधिसूचना /०७/२०२४, मुंबई, दि. ई-स्वाक्षरीत नमूद

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.पोलीस-१८२०/प्र.क्र.१३४/पोल-५अ दि.१९ मार्च २०२५

**विषय :-** महाराष्ट्र पोलीस अकादमी,नाशिक यांच्या आस्थापनेवर पोलीस उप निरीक्षकांची ४४७ अधिसंख्य पदे निर्माण करणेबाबत

******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.पोलीस-१८२०/प्र.क्र.१३४/पोल-५अ,दि.१९,मार्च, २०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtragov.inया संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०३१९१५०११३०५२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 25-03-2025 07:04:54

**( प्रविण शिखरे )**
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/प्रशासन), महाराष्ट्र राज्य,मुंबई.
विशेष पोलीस महनिरीक्षक, आस्थापना,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
कार्यासन अधिकारी का.क्र.५

प्रत
अपर पोलीस महासंचालक (नि. व स), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक (नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांच्या आस्थापनेवर पोलीस उप निरीक्षकांची ४४७ अधिसंख्य पदे निर्माण करणेबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : पोलीस- १८२०/प्र.क.१३४/पोल-५अ**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- १९ मार्च २०२५

**वाचा :-**

१) अपर पोलीस महासंचालक (आस्थापना) पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई यांचे पत्र क्र. पोमसं/५/१०/ससे पोउनि (मुख्य) परीक्षा -२०२१/२१/२०२३, दि.२७.०२.२०२५
२) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक-पदनि-२०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दि.२०.०२.२०१६

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा- २०२१ मधील, २०२० व २०२१ च्या परीक्षेच्या प्रतिक्षा यादीमधील, मागील सत्रामधील मुदतवाढ दिलेले, मा. उच्च न्यायालय व मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार प्रशिक्षणास पाठविण्यात आलेले व चारित्र्य पडताळणी संदर्भात अमुस (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने पात्र ठरविलेले अशा एकूण ४४७ उमेदवारांचे पोलीस उपनिरीक्षक पदाचे १२ महिन्यांचे प्रशिक्षण महाराष्ट्र पोलीस अॅकडमी, नाशिक येथे प्रशिक्षण सत्र क्र.१२६ मध्ये दि.२३.१२.२०२४ पासून सुरु करण्यात आले आहे. सदर प्रशिक्षाणार्थी पोलीस उपनिरीक्षकांचे वेतन व भत्ते अदा करण्याकरीता महाराष्ट्र पोलीस अॅकडमी, नाशिक यांच्या आस्थापनेवर पोलीस उपनिरीक्षकांची ४४७ अधिसंख्य पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा- २०२१ मधील, २०२० व २०२१ च्या प्रतिक्षा यादीमधील, मागील सत्रामधील मुदतवाढ दिलेले, मा. उच्च न्यायालय व मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार प्रशिक्षणास पाठविण्यात आलेले व चारित्र्य पडताळणी संदर्भात अमुस (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने पात्र ठरविलेले अशा एकूण ४४७ प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षकांचे वेतन व भत्ते अदा करण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अॅकडमी, नाशिक यांच्या आस्थापनेवर **दि.२३.१२.२०२४ ते दि.२२.१२.२०२५** या कालावधीसाठी पोलीस उपनिरीक्षकांची ४४७ अधिसंख्य पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर अधिसंख्य पदे विविध पोलीस घटकांमध्ये पोलीस उपनिरीक्षकांच्या रिक्त असलेल्या पदांच्या अधिनतेने निर्माण करण्यात आली असल्याने ही पोलीस उप निरीक्षकांची रिक्त पदे ज्या आस्थापनेवर आहेत त्या आस्थापनेवर वेतन काढले जाणार नाही याची खात्री करण्यात यावी.

३. याकरीता होणारा खर्च वित्तीय वर्ष सन २०२४-२५ व सन २०२५-२६ साठी " मागणी क्र. बी-१, २०५५ पोलीस, १०९ जिल्हा पोलीस दल, (००) (०१) जिल्हा पोलीस बल" या लेखाशिर्षाखाली संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांना मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय संदर्भ क्र.२ येथील वित्त विभाग,शासन निर्णय क्रमांक.पदनि-२०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दिनांक २०.०२.२०१६ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०३१९१५०११३०५२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUGRIV SAMBHAJI DHAPATE

Digitally signed by SUGRIV SAMBHAJI DHAPATE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=d02297f9b5e889636956e39bfae4ea112e908c0e9a7e572d4190f9709a817f51, postalCode=400032,
st=Maharashtra,
serialNumber=FC102DE27DC1B41E747AC6CBB491C4209459C3CF340720EA98FD1D95B19C9F65, cn=SUGRIV SAMBHAJI DHAPATE
Date: 2025.03.19 15:02:22 +05'30'

**( सुग्रिव धपाटे )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. अपर पोलीस महासंचालक (आस्थापना/प्रशासन), पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई
४. विशेप पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई
५. संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
६. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र -१, मुंबई
७. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
९. जिल्हा कोपागार अधिकारी, नाशिक
१०. निवडनस्ती (पोल-५अ)